# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. २८/०६/२०१६
# (दि. ०७/०५/२०१६ रोजीची सभा)

**प्रकरण क्र. १० :-** **महानगरपालिका हद्दीतील मोबाईल टॉवर संबंधित कामे करण्यासाठी खाजगी संस्थेकडून निविदा मागविणेबाबत.**

**ठराव क्र. ११ :-**

मिरा भाईदर महानगरपालिका विविध ठिकाणी अनेक मोबाईल टॉवर उभारण्यात आलेले आहे. त्यापैकी बहुतांश मोबाईल टॉवर यांना मालमत्ता कराची कर आकारणी करण्यात आली आहे. तथापी काही मोबाईल टॉवर यांना कर आकारणी झाली नसल्याचे दिसून आले आहे. तसेच अनेक मोबाईल टॉवर उभारण्याकरिता संबंधित आस्थापनांनी महानगरपालिकेकडून परवानगी घेतली नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कर आकारणी तसेच परवानगी यामध्ये तफ़ावत आली आहे.

तसेच बहुतांश मोबाईल टॉवर आस्थापनांनी परवानगी प्राप्त करून घेण्याकरीता महानगरपालिकेकडे पत्रव्यवहार केलेला आहे. परंतू परवानगी प्राप्त न झाल्याने कर विभागाने अशा मोबाईल टॉवर यांना अनधिकृत बांधकामावर लावावयाच्या शास्ती रक्कमेची आकारणि केली आहे. त्यामुळे सदर मोबाईल टॉवर आस्थापना यांनी मा.न्यायालयात याचिका दाखल करून निव्वळ कराचा भरणा करीत आहे त्यामुळे शास्ती रक्कम व त्यावरील व्याजाच्या रक्कमेत वाढ होऊन मालमत्ता कराच्या मागणीमध्ये नाहक फ़ुगवटा निर्माण होत आहे. तसेच कर विभागातील कर्मचारी यांनी निवडणुका/जनगणना व इतर कार्यालयीन कामाचे अतिरिक्त कार्यभार सोपविल्याने महानगरपालिकाहद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे महानगरपालिका कर्मचाऱ्यांमार्फ़त सर्व्हेक्षण करून कराची वसुली करणेस अशक्य होत आहे.

वरील बाबींचा विचार करून महानगरपालिका हद्दीतील सर्व मोबाईल टॉवर यांचे सर्व्हेक्षण करणे,सदर मोबाईल टॉवर यांना परवानगी आहे किंवा नाही याची पडताळणी करणे, परवानगी नसल्यास संबंधित मोबाईल टॉवर आस्थापना यांचेशी समन्वय साधून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून राज्य शासनाच्या धोणानुसार परवानगी प्राप्त करून घेणे, मोबाईल टॉवर अस्तित्वात असल्यास नियमानुकुल करणे, परवानगी देणे शक्य नसल्यास टॉवर निष्कासित करणेबाबत अतिक्रमण विभागास सुचित करणे, आवश्यक परवानगी शुल्काचा भरणा करून घेणे, परवानगी प्राप्त करून घेतले नंतर कर विभागाशी समन्वय साधून मालमत्ता कर आकारणी करून घेणे व कर वसुली करणे इत्यादी कामे करणेकामी अभिकर्ता नेमणे योग्य होईल. सदर अभिकर्ता नेमल्यास उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरची परवानगी, कर आकारणी, कर वसुली, इ.कामे सुलभ रित्या होऊन, मोबाईल टॉवरच्या परवानगी शुल्क व मालमत्ता कराच्या वसुली रक्कमेत वाढ होऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणे शक्य होईल.

तरी उपरोक्तप्रमाणे मोबाईल टॉवरचे सर्व्हेक्षण, परवानगी, नियमितीकरण, कर आकारणी व वसुली करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ६६(अ) व ७३ नुसार निविदेद्वारे अभिकर्ता नियुक्त करणेकामी ही महासभा मंजूरी देत आहे. महानगरपालिकेच्या हितार्थ अभिकर्ता नेमणेबाबतचे अटीशर्ती ठरविण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना असतील.

**सुचक :- श्री. रवि व्यास** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | |
| २ | शरद केशव पाटील | २ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | दक्षता राजेंद्र ठाकुर | निरंक |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | पाटील वंदना विकास | |
| ७ | कोठारी सुमन रमेश | ७ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ८ | डॉ. नयना मनोज वसाणी | ८ | पाटील सुनिता कैलास | |
| ९ | सिमा कमलेश शहा | ९ | विराणी रेखा अनिल | |
| १० | जैन गिता भरत | १० | पुजारी कांचना शेखर | |
| ११ | अरोरा दिपिका पंकज | ११ | पिसाळ मनिषा नामदेव | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | रावल भगवती जयशंकर | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | मेहता डिंपल विनोद | १३ | वंदना रामदास चक्रे | |
| १४ | मेघना दिपक रावल | १४ | अनिता जयवंत पाटील | |
| १५ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १५ | गोविंद हेलन जॉर्जी | |
| १६ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १६ | काझी रशीदा जमील | |
| १७ | सुजाता रविकांत शिंदे | १७ | इनामदार जुबेर | |
| १८ | पाटील प्रेमनाथ गजानन | १८ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १९ | सिंग मदन उदितनारायण | १९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| २० | कांगणे यशवंत ठकाजी | २० | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| २१ | अनिल बाबुराव भोसले | २१ | सामंत प्रमोद जयराम | |
| २२ | कासोदरीया अश्विन श्यामजी | २२ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २३ | जैन दिनेश तेजराज | २३ | लियाकत ग. शेख | |
| २४ | जैन रमेश धरमचंद | २४ | भोईर कमलेश यशवंत | |
| २५ | डॉ. राजेंद्र जैन | २५ | अशोक तिवारी | |
| २६ | निलम हरिश्चंद्र ढवण | | | |
| २७ | तारा विनायक घरत | | | |
| २८ | शुभांगी महिन कोटियन | | | |
| २९ | जयमाला किशोर पाटील | | | |
| ३० | परमार अनिता भरत | | | |
| ३१ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| ३२ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३३ | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३४ | म्हात्रे प्रभाकर पद्माकर | | | |
| ३५ | संदिप मोहन पाटील | | | |
| ३६ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३७ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३८ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३९ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ४० | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ४१ | भोईर भावना राजु | | | |
| ४२ | भोईर राजु यशवंत | | | |
| ४३ | जाधव मोहन महादेव | | | |
| ४४ | मुन्ना सिंग | | | |
| ४५ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४६ | दिप्ती शेखर भट | | | |
| ४७ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**